Vol. 25 | Issue 2 | AUGUST 2023

# The WIND

Bulletin of
Rotary Club of Pune Westend
RID 3131 | Club No. 52038

25 GLORIOUS YEARS ROTARY CLUB OF PUNE WESTEND

Rotary CREATE HOPE in the WORLD

CELEBRATING THE 25TH GLORIOUS YEAR

Silver Jubilee Year

CHARTERED ON 28TH APRIL 1999

Membership

President : Rtn. Nitin Washikar
(M) : 93701 31353
Secretary : Rtn. Dr. Suvarnarekha Devadhar
(M) : 80879 47943
Editor : Ann. Geeta Godbole
(M) : 99236 99663

Guest Editor : Ann. Vinita Washikar

## रौप्य महोत्सवी मनोगत



एक रोटरी वर्ष संपून पुढच्या वर्षात जाताना नवीन प्रेसिडेंटच्या गळ्यात जबाबदारीची माळ घातली की आपण पास्ट प्रेसिडेंट म्हणून मिरवायला मोकळे... निदान आज पर्यंत तरी साधारणपणे अशीच प्रथा होती. पण हे क्लबचे **रजत महोत्सवी वर्ष**... यावर्षी आपण सगळे मिळून हा महोत्सव साजरा करू आणि माझ्यासोबत गेल्या वर्षीची सगळीच कार्यकारिणी आहे तशीच यावर्षी काम करेल असे ठरले. रजत महोत्सवी वर्ष सुरू होण्याची उत्सुकता होतीच आणि ठरल्याप्रमाणे एक जुलैला आपण या वर्षात पदार्पण केले. बारा जणांना बारा महिने वाटून दिलेले आहेतच आणि त्यात पहिलाच महिना माझा. जसं हे वर्ष सुरू झाले तसा सगळ्यांचाच उत्साह जाणवू लागला आहे. हे वर्ष साजरे करण्याच्या निरनिराळ्या कल्पना मांडल्यानंतर सगळ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि बघता बघता पहिला महिना संपला. खरंतर आपला क्लब आणि सगळेच मेंबर इतके छान आहेत की सगळ्यांबरोबर मिळून मिसळून काम करायला खूप मजा येते. प्रेसिडेंट म्हणून आपलं वर्ष संपलं याचा आनंद वाटावा की हळहळ हे खरंच कळत नाहीये.

आता ऑगस्टचा प्रेसिडेंट PP आनंद भागवतवार... आणि पुढे दर महिन्याला एकेक पास्ट प्रेसिडेंट... खरोखरच मजा येणार आहे. सगळ्यांच्या कल्पना राबवता राबवता हे वर्ष कधी संपलं कळणारही नाही. अर्थातच हे वर्ष आपल्याला खूप काही आनंद देऊन जाईल याची खात्री आहे.

या महिन्यासाठी आनंदला आणि अर्थातच पुढच्या प्रत्येक महिन्यासाठी सर्वच पास्ट प्रेसिडेंट्स ना खूप खूप शुभेच्छा..!

**प्रे. नितीन वाशीकर**

Congratulations


Rotary | IMAGINE ROTARY

2022-23 ROTARY CITATION

Awarded to the Rotary Club of

Pune Westend

for helping **imagine Rotary** in the lives of people all over the world.

Jennifer Jones
President, Rotary International

## Anns Fellowship









# Installation ( 23-24 ) & Club Awards

पाहता पाहता आपल्या क्लबने २५ व्या वर्षात पदार्पण केले. रौप्य महोत्सवी वर्ष एक वेगळाच उत्साह आहे. प्रेसिडेंट नितीन वाशीकर यांनी अत्यंत यशस्वीरित्या पार पाडले. आपल्या क्लबच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रोटरी क्लबची पारंपरिक पद्धत सोडून एक वेगळा नावीन्यपूर्ण प्रयोग करायचे आपल्या क्लबने ठरविले आहे. एक अभिनव योजना.

एक माजी प्रेसिडेंट प्रत्येक महिन्यासाठी ॲक्टिव्ह प्रेसिडेंट म्हणून काम पाहणार. मागील वर्षाचे सर्व बोर्ड तसेच काम पाहणार. ह्या सगळ्याचे समन्वय प्रेसिडेंट नितीन वाशीकर हेच पाहणार. अशा आगळ्या वेगळ्या बोर्ड आणि १२ प्रेसिडेंट ह्यांचे इंस्टॉलेशन दिमाखात ७ जुलै रोजी पार पडले.

म्हंटले तर एकदम साधा आणि म्हटले तर एकदम जिव्हाळ्याचा असा हा कार्यक्रम झाला. सर्व प्रथम क्लबच्या फेलोशिप नंतर प्रथेप्रमाणे राष्ट्रगीत झाले व आपल्या क्लबची यशस्वी कार्यक्रम संचालिका रो. तृप्ती आडके हिने कार्यक्रमाचे सूत्र संचालन ताब्यात घेऊन कार्यक्रमाला सफाईदार सुरुवात केली. प्रे. नितीन ह्यांनी आपल्या क्लबच्या चार्टर्ड प्रेसिडेंट सौ. नंदिनी डिंगणकर ह्यांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत केले. त्या नंतर प्रे. नितीन ह्यांनी आपल्या मागील वर्षाचा आढावा देत क्लब तर्फे झालेले ठळक प्रोजेक्ट व कार्यक्रम ह्यांची दृकश्राव्य माध्यमातून माहिती दिली.

त्या नंतर अत्यंत लाडका कार्यक्रम म्हणजे सर्व सदस्य वर्षभर काम करीतच असतात त्यातले उल्लेखनीय काम करणाऱ्या सदस्यांना क्लब अवॉर्ड व प्रेसिडेंट अवॉर्ड देऊन सन्मानित केले गेले.

त्या नंतर सगळ्यात महत्वाचा कार्यक्रम म्हणजे पिन सेरीमनी, तर कार्यक्रमाच्या विशेष अतिथी आपल्याच क्लबच्या चार्टर्ड प्रेसिडेंट सौ. नंदिनी डिंगणकर ह्यांच्या हस्ते प्रे. नितीन वाशीकर आणि बोर्ड ह्या बरोबर विशेष नेमणूक झालेले ११ प्रेसिडेंट ह्यांचे इंस्टॉलेशन पिन सेरीमनी करून झाले.

त्या नंतर प्रे. नितीन ह्यांनी १२ प्रेसिडेंट कोणत्या महिन्यात काम करणार ते व ह्या नव्या प्रयोगाची माहिती क्लबला दिली

त्यानंतर चार्टर्ड प्रेसिडेंट सौ.नंदिनी ह्यांनी आपले मनोगत सांगून प्रे. नितीन सहित सर्व बोर्ड डायरेक्टर व इतर ११ प्रेसिडेंट ह्यांना शुभेच्छा दिल्या.

रो. योगेश येवले

Club Awards

Silver Jubilee Year



**रौप्य महोत्सवी वर्ष... एक अभिनव योजना... एक वेगळाच उत्साह**



## Club Awards ( 22-23 )

*Congratulations*

Best Rotarian -
PP Rtn. Sunita Chandwankar

Best Ann -
Ann Geeta Godbole

Best Couple -
PP Rtn. Rajeev &
Ann Anjali Dadhe

Best Project -
Veluban
(Bamboo Plantation
at Paal Khurd)
PP Rtn. Anand Bhagwatwar

Best Committee -
Program Committee Chair
Ann Swati Bendre

Rising Star -
Rtn. Bhushan Joshi

**पुण्याई...** साधारणपणे २४ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. मला आलेला एक छान, सुखद अनुभव......



आमच्या दादांना प्रवासाची खूप आवड, शिक्षक असल्याने उन्हाळ्याची आणि दिवाळीची सुट्टीही असायची. दादांचा पिंड जात्याच भ्रमंतीचा आणि त्यात मिळणाऱ्या ह्या मोठ्या सुट्ट्या मग काय भरपूर हिंडायचे, फिरायचे, मस्त भटकंती ठरलेलीच. तर १९९८ ची दिवाळीची सुट्टी होती. दादांनी मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, राजस्थान, गुजरात आणि तिथून पुणे अशी २० दिवसांच्या प्रवासाची योजना आखली. मी, आई, दादा आणि दादांच्या शाळेतले फाटक सर व फाटक बाई असे आम्ही ५ जण प्रवासाला निघालो. दादांना फोटोग्राफीची सुद्धा आवड होती. मी ही त्यांच्या हाताखाली फोटोग्राफी शिकत होतेच. इतिहास हा आमच्या दोघांचाही आवडीचा विषय, शिवाय आम्हाला कोरीवलेणी, मंदिरे पाहण्याची आवड आणि आई धार्मिक त्यामुळे हे सगळं बघता मिश्र सहल होणार होती. दिवाळी साजरी करून आम्ही निघालो. मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर, उज्जयनी, सांची, विदिशा असे पाहून आम्ही झाशीला आलो. झाशीहून आम्ही छत्तरपुर (छत्रसाल राजाचे गाव, छत्रसाल हा बुंदेलखंडाचा राजा आणि मस्तानीचे वडील) मार्गे खजुराहोला जाणार होतो. संपूर्ण प्रवासाचे आमचे राऊंड टूर चे रेल्वेचे तिकीट होते. खजुराहोला रेल्वे नसल्याने आम्ही झाशीच्या रेल्वे स्टेशनवर उतरलो, तिथून पुढे खजुराहोला जायचे असल्याने बरोबर सगळे सामान घेऊन फिरण्यापेक्षा आमचा कॅमेरा, लेन्सेस, थोडे कपडे, खाऊचे सामान, पाणी असे मोजकेच सामान एका बॅग मध्ये वेगळे केले आणि बाकीचे सामान झाशीच्या क्लोक रूम मध्ये ठेवून आम्ही बसने छत्तरपुरला आलो. खजुराहो बघत, विस्मयचकित होत, फोटो काढत भरपूर फिरलो. २ दिवस आम्ही खजुराहो बघत फिरत होतो. मनाप्रमाणे भटकून झाल्यावर खजुराहोच्या हॉटेल मधून सामान घेतले आणि छत्तरपुरच्या बस स्टँडवर झाशीला जाणाऱ्या बसची वाट पहात उभे होतो. फाटक सरांजवळ त्यांची एक छोटी बॅग, दादांच्या हातात आमची बॅग आणि माझ्या हातात कॅमेरा, लेन्सेस, खजुराहो मध्ये काढलेल्या फोटोंचे रोल्स, आमच्या संपूर्ण प्रवासाचे रेल्वेचे तिकीट आणि झाशीच्या क्लोक रूममध्ये ठेवलेल्या आमच्या सामानाची पावती अशा वस्तूंची एक बॅग असे सामान होते. बस यायला वेळ होता म्हणून दादा म्हणाले जरा चहा घेऊ. तिथेच हॉटेलमध्ये चहा मागवला, बाहेर उभे राहून आम्ही सगळेच चहा पीत होतो. मला चहा जरा थंड लागतो, ती कॅमेऱ्याची बॅग थोडी जड वाटू लागली म्हणून तिथेच बाजूला एक बुलेट उभी होती. तिच्या सीटच्या मागे जो छोटा बार असतो त्या बारला मी कॅमेऱ्याची बॅग अडकवली. चहा पिऊन झाला. थोड्याचवेळात बस आली. बसमध्ये चढायचे तर बॅग घ्यावी म्हणून मागे वळले आणि ब्रह्मांड आठवलं. मी ज्या बुलेटला बॅग अडकवली होती ती बुलेटच तिथे नव्हती...... एवढं मोठं धूड माझ्या शेजारीच सुरू होऊन धडधडत निघून गेलं तरी मला काहीही कळले नव्हते. काय करावं ते सुचेना. चहावाल्याला विचारलं गाडी कधी गेली तर तो म्हणाला की कधीच गेली. मग तो गाडीवाला कोणाच्या ओळखीचा होता का? अशा चौकश्या केल्या, पण काहीच कळले नाही. मी नुसती ढसाढसा रडत होते. बॅग मध्ये असलेले सामान मला सारखे आठवत होते. कॅमेरा, लेन्सेस अशा किमती वस्तू, त्यात आत्ताचे खजुराहोचे फोटो काढलेले सुमारे १० ते १२ रोल्स, आमचे प्रवास तिकीट आणि सामानाची क्लोक रूमची पावती. माझ्या हलगर्जीपणा मुळे बॅग हरवली होती आणि आमचे सामान, तिकीट आता आम्हाला कसे मिळणार ?? हे प्रश्न मनात येत होते. ह्या सर्व प्रसंगात सर्वात महत्वाचे म्हणजे दादा अगदी शांत होते. माझ्याकडून चूक झालेली असूनही मला ते काहीही बोलत नव्हते आणि ह्याचा मला जास्त त्रास होत होता. हॉटेलवाला म्हणाला तुम्ही थोडं थांबा ज्याची बुलेट होती तो येईल तुमची पिशवी घेऊन. ह्याच आशेवर आम्हीही थांबून राहिलो होतो. आमच्यासाठी बस सुद्धा थांबली होती. तेवढ्यात ते धूड धड धड करत आलं, आमच्यापाशीच येऊन थांबलं आणि माझी बॅग मला मिळाली. राजेंद्र तिवारी नावाचा तो भला माणूस बुलेट घेऊन त्याच्या घरी पोचल्यावर त्याने मागच्या बाजूला बॅग बघितली. चहाच्या हॉटेलपाशीच कोणाची तरी असावी असा विचार करून तो परत आला होता. मी अक्षरशः त्याच्यापुढे साष्टांग दंडवत घातले. मला शांत करत तो परत हॉटेलमध्ये जाऊन आमच्यासाठी चहा घेऊन आला. आमची थोडी चौकशी केली. कुठून आलो, कशासाठी आलोय इत्यादी. दादांनी त्याला बक्षीस म्हणून काही पैसे देऊ केले, ते अर्थातच त्याने नाकारले आणि ते पैसे नाकारताना त्याने दिलेले कारण ऐकून मी त्याच्यापुढे पुन्हा एकदा नतमस्तक झाले. पैसे नाकारताना तो म्हणाला, आप पुनासे आये है। बाजीराव पेशवा के पुनासे, बाजीराव पेशवाने हमारे छत्रसाल राजा की मदद की थी। हम आपसे पैसे नही ले सकते।

कोण कुठले आम्ही आणि कोण कुठला तो राजेंद्र तिवारी पण बाजीरावाच्या आणि छत्रसाल राजाच्या पुण्याईने जोडले गेलो होतो. एवढ्या वर्षानंतर सुद्धा बाजीरावाने केलेल्या मदतीची जाण ठेवून आम्हाला मदत करणारा तो राजेंद्र तिवारी कुठे आणि मतलब साध्य होताच परके होणारे कुठे..

मग काय बाजीरावाचे स्मरण करून गाडीत बसलो. झाशीला येऊन सामान घेतले, त्या रात्री झाशीतच मुक्काम केला आणि दुसऱ्याच दिवशी आमच्या योजनेत समाविष्ट नसलेल्या बाजीरावाच्या समाधीला रावेरखेडीला जाण्यासाठी बस मध्ये बसलो.

रो. डॉ. सुवर्णरेखा देवधर

LIMCA BOOK of RECORDS

The Limca Book of Records is an annual reference book published in India documenting world records held by Indians. The records are further categorized into education, literature, agriculture, medical science, business, sports, nature, adventure, radio and cinema.



Pune: Lonavla-based designer Rishikesh Raut has been included in the Limca Book of Records, 2016, after making India's longest 3D metal design at Almatti dam in Karnataka.

Raut designed and installed the metal sign at the dam in mid-2015. Almatti is the biggest dam under the Krishna Bhagya Jal Nigham Limited and has been named after Lal Bahadur Shastri.

"The scale and size of the installation was one of the many challenges. The letters were approximately the size of a two-storey building and Kannada being a highly cursive language, designing the letters was hard work," Raut said.

The length of the sign is 112.7m, which is more than the 106.6m-long "Hollywood" sign in Los Angeles, USA

रोटरीचे २०२३ – २४ चे ब्रीदवाक्य Create Hope In The World असे आहे. त्यामुळे त्यास अनुसरून आपल्या क्लबने दिनांक २२.०७.२०२३ रोजी पानशेत मधील दोन शाळांमध्ये यावर्षीचा पहिला लिटरसीच्या अंतर्गत कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमासाठी माजी प्रेसिडेंट राजीव दाढे आणि क्लबच्या यावर्षीच्या literacy chair ॲन अंजली दाढे यांनी पुढाकार घेऊन शाळांशी चर्चा करून प्रेसिडेंट नितीन वाशीकर यांच्या मदतीने कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली. त्याप्रमाणे रो. राजीव दाढे यांच्या पानशेत येथील सुंदर घरी नाष्टा करून सकाळी बरोबर साडेनऊ वाजता आम्ही सर्वजण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुरण खुर्द येथे पोचलो. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग भरतात. ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे राष्ट्रगीताने सुरुवात करून त्यानंतर साधारण २५ विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना ॲन स्वाती बेंद्रे, ॲन स्नेहल कुलकर्णी, ॲन गीता गोडबोले, रो. तृप्ती, व ॲन अंजली दाढे यांनी क्लब तर्फे PT गणवेश, वह्या, पाटी पेन्सिल इत्यादीं शालेय साहित्य वाटप केले. या शाळेचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे दुर्गम भागातून असून सुद्धा खूपच समंजस आणि ॲक्टिव्ह होते. यानंतर रोटेरियन तृप्ती आडके यांनी या मुलांसाठी योगाचा वर्ग घेतला यामधे वेगवेगळी आसने, सूर्य नमस्कार व ओंकार याचा समावेश होता. सर्वच मुलांनी यात अतिशय उत्साहाने भाग घेतला. यानंतर ॲनेट तन्वी वाशीकर हिने पाठविलेल्या खाऊचे सर्वांना वाटप केले. या शाळेतील शिक्षिका आगे मॅडम आणि कडू मॅडम यांचे एवढ्या दुर्गम भागात येऊन शिकवणे खूपच कौतुकास्पद आहे. तेथून आम्ही जवळच असलेल्या मातोश्री सोनाबाई रामचंद्र देडगे विद्यालय येथे गेलो. या शाळेत ई लर्निंग किट इयत्ता आठवी नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी भेट देण्यात आले तसेच आठवीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी या शाळेचे नाकदी सर तसेच शाळेचे आधारस्तंभ श्री देडगे हे जातीने उपस्थित होते. हा कार्यक्रम आटोपल्यावर नेहमीप्रमाणे रुचकर फलोशिप श्री राजीव दाढे यांच्या फार्म हाऊस वर पार पडली. या सर्व कार्यक्रमांसाठी माजी प्रेसिडेंट रोटेरियन उदय कुलकर्णी, रो. शैलेश नांदुरकर, रो. राजीव दाढे आणि रो. राजेश किर्लोस्कर यांनी क्लबला डोनेशन देऊन मोलाचा हातभार लावला. या सगळ्या मदतीमुळे मुले अजून उत्साहाने शाळेत येतील, अभ्यास करतील. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून खरोखर समाधान मिळाले.

ॲन गीता गोडबोले











**Create Hope In The World**

---


**August Program**

4 August — New Generation New Dimension
नव्या युगाची नांदी
वक्ता: प्रांजल जोशी

11 August — चरखा – एक संस्कृती
प्रस्तुतकर्ता –उमेश ठाकूर व कोथरुड चरखा संघ

18 August — पंचांग – भारतीय कालगणना
वक्ता – दाते पंचांगचे श्री. विनय दाते

25 August — Yet to finalise



*Happy Birthday*

22 August Rajeev Dadhe
31 August Aniruddha Bokil